लोकमत
बुधवार ८.११.२०२३

# उच्चशिक्षित प्राजक्ताकडे आता कसबा ठाणेची धुरा

## एमबीए शिक्षित : घरातून राजकीय बाळकडू

**शब्बीर मुल्ला**
लोकमत न्यूज नेटवर्क

**यवलूज :** राजकारणात महिलांचा सहभाग वाढत असला तरी शिक्षणाच्या अभावामुळे बहुतांशी महिला बोलत नसल्याचा सर्वश्रुत अनुभव आहे.



सामाजिक कामाची जाणीव असलेल्या आणि एमबीएचे शिक्षण घेतलेल्या प्राजक्ता दिलीप पाटील ही उच्चशिक्षित मुलगी कसबा ठाणेच्या लोकनियुक्त सरपंचपदावर विराजमान झाली. घरातूनच तिला सामाजिक आणि राजकीय बाळकडू मिळाल्याने गावविकासासाठी त्याचा उपयोग होणार आहे.

विवेकानंद महाविद्यालयात असताना प्राजक्ताने विद्यार्थी प्रतिनिधित्व केले आहे. त्यांनी गेल्या वर्षी पुणे विद्यापीठातून एमबीएची पदवी घेतली. दोन वेळा पराभवाचा धक्का बसलेल्या दिलीप पाटील गटाने महिला आरक्षणामुळे सरपंच पदासाठी प्राजक्ताच्या आईसाठी कार्यकर्ते आग्रही होते. परंतु आजोबा शहाजी पाटील आणि वडील दिलीप पाटील यांचा सामाजिक आणि राजकीय वारसा मिळालेल्या प्राजक्ताने लोकनियुक्त सरपंचपदासाठी वडिलांसह गटाकडे मागणी केली. शिक्षणाच्या उपयोग गावच्या विकासासाठी होईल या विश्वासाने प्राजक्ताला गटाने उमेदवारी दिली तर गावाने त्यांना विजयी करुन विकासाची जबाबदारी दिली आहे. शिक्षणाबरोबर वडिलांची सामाजिक धुरा गावात सांभाळत असताना त्यांच्यासमोर अनेक समस्या येत होत्या. सत्ता नसताना गावात अनेक सामाजिक कामे आणि उपक्रम राबविण्यासाठी प्राजक्ता वडिलांकडे आग्रही असायची. उच्च शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग सामाजिक कार्यासाठी केल्याने त्याचेच फलित प्राजक्ताला सरपंच पदातून मिळाले आहे.

> गावच्या विकासाच्या दृष्टीने राजकारणात सुशिक्षित युवा पिढी येणे गरजेचे आहे. गावातील लोकांच्या मूलभूत गरजा तर पूर्ण करावयाच्या आहेत. गावात सामाजिक, शैक्षणिक समस्या प्राधान्याने सोडविणार आहे. महिला सक्षमीकरणासाठी किंबहुना शासनाच्या विविध योजनांची माहिती घराघरापर्यंत पोहोचविण्यासाठी जबाबदार नागरिक म्हणून माझे पहिले कर्तव्य असेल.
>
> **- प्राजक्ता पाटील,** लोकनियुक्त सरपंच कसबा ठाणे

तरुण भारत

# अंबाबाई मंदिरात उद्यापासून किरणोत्सव

## पूर्ण क्षमतेने किरणोत्सवाची शक्यता; तज्ज्ञांकडून पाहणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

करवीर निवासिनी अंबाबाईच्या किरणोत्सवाला गुरुवारपासून (दि. ९) सुरुवात होत आहे. ९ ते १३ नोव्हेंबर कालावधीत होणारा किरणोत्सव पूर्ण क्षमतेने होण्याची शक्यता आहे. मंगळवारी तज्ज्ञांकडून किरणांची तीव्रता तपासण्यात आली. यावरुन बुधवारीच किरणे पितळी उंबऱ्यापर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. केवळ ढगाळ वातावरणाचा अडथळा न आल्यास संपूर्ण किरणोत्सव पाच दिवस चालणार आहे.



दक्षिणायण कालखंडातील कि रणोत्सव नोव्हेंबर महिन्यात होतो. गुरुवारपासून सुरू होणाऱ्या किरणोत्सवाच्या अनुषंघाने विवेकानंद कॉलेजचे प्राध्यापक डॉ. मिलिंद कारंजकर यांनी मंगळवारी मंदिरात पाहणी केली.

टेलिस्कोप, इनिमोमीटर, मॅग्नीटोमीटर या उपकरणांच्या मदतीने किरणांचे अंतर, वाऱ्याचा वेग व किरणांशी दिशा तपासण्यात आली.

बुधवारी किरणे पितळी उंबरा ओलांडून गर्भगृहात प्रवेश करतील अशी शक्यता आहे. पाहणीवेळी धर्मशास्त्र मार्गदर्शक गणेश नर्लेकर व देवस्थानाचे कर्मचारी उपस्थित होते.

Wed. 8

पुढारी
MY कोल्हापूर
बुधवार, ८ नोव्हेंबर २०२३

# कॅन्सरच्या विरोधात एकत्रितपणे लढा उभारण्याची गरज : डॉ. बनसोडे

**कोल्हापूर :** भारतात कॅन्सरचे प्रमाण वाढत आहे. याचे विविध प्रकार असून कॅन्सरवर मात करण्यासाठी भाज्या मिठाच्या पाण्यात धुऊन खाणे, मानसिक ताणतणाव कमी करणे, चांगल्या जीवनशैलीचे आचरण करणे महत्त्वाचे आहे. कॅन्सरच्या विरोधात एकत्रितपणे लढा उभारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सांगोला महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रकाश बनसोडे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील प्राध्यापक प्रबोधिनी आयोजित कर्करोगाची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाय या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी गणित विभागप्रमुख डॉ. एस. पी. थोरात होते. प्रबोधिनी प्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख डॉ. संजय अंकुशराव यांनी करून दिली. डॉ. कैलास पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.